## तदर्थ जिल्हा न्यायाधीश-१ व सहायक सत्र न्यायाधीश यांचे न्यायालय,यवतमाळ

**सत्र खटला क्र. १५/२०१९**
**निशाणी क्र.४१**

**महाराष्ट्र शासन** तर्फे पो.स्टे. घाटंजी सरकारी अभियोक्ता

**..वि..**

**भारत माणिक दलाल** आरोपी.

| **शासन तर्फे साक्षीदार क्र. ३** | |
|---|---|
| मी याद्वारे शपथपूर्वक सांगतो की - | |
| माझे संपूर्ण नाव | अमोल केशवराव भांडवलकर |
| वय अंदाजे ४१ वर्षे | धंदा- नौकरी, ग्राम पंचायत अधिकारी |
| राहणार | यवतमाळ ता. जि. यवतमाळ. |
| **सरतपासणी श्री. एन.एन.पांडे सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचेमार्फत शपथेवर सुरुः-** | |

सन २०१६ मध्ये मी ग्रामसेवक म्हणून ग्राम पंचायत घाटंजी येथे कार्यरत होतो व त्याची पंचायत समीती घाटंजी होती. दिनांक १६/०७/२०१६ रोजी पंचायत समिती घाटंजी येथील सभागृहामध्ये सभा होती. त्या सभेमध्ये नंदा कांगणे व इतर ग्रामसेवक, विस्तार अधिकारी श्री मस्के, गटविकास अधिकारी श्री. मानकर व मी हजर होतो. सभा सकाळी ११.०० वाजता सुरु झाली व संध्याकाळी ४.४५ वाजता संपली. त्यानंतर श्री मानकर हे सभा संपल्यानंतर निघून गेले. मात्र, मी, श्री मस्के आणि इतर ग्रामसेवक सभागृहामध्ये हजर होतो. त्यानंतर अंदाजे ५.०० वाजता आरोपी भारत दलाल व त्याच्यासोबत दोन व्यक्ती सभागृहामध्ये आले. त्यानंतर आरोपी भारतने नंदा कांगणेला विचारले की '' विहिरीच्या मस्टरवर सही का करत नाही''. आरोपीने नंदा कांगणेला शिवीगाळ केली की ''तु माजली आहे, तु शहाणी आहे''. तसेच आरोपीने नंदा कांगणेला धमकी दिली की ''तु गावात ये तुला बघून घेईल". आरोपीचा हात नंदा कांगणेच्या साडीला लागला. तसेच झटापटीमध्ये नंदा कांगणेच्या बांगडया फुटल्या. त्यानंतर आम्ही तेथून निघून गेलो. पोलीसांनी माझे बयान नोंदविले होते. आरोपी आज न्यायालयामध्ये हजर आहे व मी त्याला ओळखतो.

**साक्षीदार त्यांच्या बयानाप्रमाणे पुरावा देत नसल्यामुळे त्याची उलटतपासणी घेण्याची परवानगी सरकारी वकिलांनी मागीतली. त्यानूसार परवानगी देण्यात आली.**

**उलटतपासणी सरकारतर्फे श्री एन.एन.पांडे सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचेमार्फत सुरुः-**

२. हे म्हणणे खरे नाही की आरोपीने नंदा कांगणेची साडी ओढली व आरोपीने नंदा कांगणेचा हात पकडला. हे म्हणणे खरे नाही की आरोपीने नंदा कांगणेच्या डोक्याचे केस ओढले. मला माहिती नाही की आरोपीने नंदा कांगणेचे मंगळसुत्र ओढण्याचा प्रयत्न केला. माझ्या बयानातील अधोरेखांकित भाग 'अ' मी पोलीसांना सांगीतला नव्हता, मात्र, पोलीसांनी तो का लिहिला याचे कारण मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की पोलीसांनी मला धमकी दिली नाही तसेच पोलीसांचा माझ्यावर दबाव नव्हता. हे म्हणणे खरे नाही की त्यामुळे मी पोलीसांना जे सांगीतले तेच त्यांनी माझ्या बयानात लिहिले. हे म्हणणे खरे नाही की मी आरोपीला वाचविण्याकरीता आज खोटी साक्ष देत आहे.

**उलट तपासणी आरोपींचे वकील श्री. ए. डी. वाघ यांचे मार्फत सुरु -**

३. हे म्हणणे खरे आहे की जी सभा झाली होती त्या सभेचे रजिष्टर कार्यालयामध्ये उपलब्ध आहे व रजिष्टरमध्ये सभेला हजर असलेल्या ग्रामसेवकांच्या सह्या असतात. हे म्हणणे खरे आहे की त्या सभेमध्ये ग्रामसेवकांना ज्या अडचणी असतात त्या बाबतची चर्चा अधिका-यांसोबत होते. हे म्हणणे खरे आहे की त्या सभेमध्ये नंदा कांगणे यांनी सुध्दा त्यांच्या अडचणी अधिका-यांना सांगितल्या.

४. हे म्हणणे खरे आहे की, नंदा कांगणे ह्या माझ्या कार्यालयीन सहकारी होत्या. सभा ही संध्याकाळच्या ४.४५ मिनीटानी संपली. हे म्हणणे खरे नाही की त्यामुळे सर्व ग्रामसेवक व कर्मचारी सभागृहातून निघून गेले होते.

५. सन २०१६ मध्ये मी घाटंजी पंचायत समिती अंतर्गत शासकिय कर्मचारी म्हणून काम करीत असल्याचे दस्तऐवज मी पोलीसांना दिले नाही.

६. हे म्हणणे खरे आहे की पोलीसांनी माझे बयान माझ्या सांगण्याप्रमाणे लिहून घेतले नाही, तसेच पोलीसांनी ते बयान मला वाचून सुध्दा दाखविले नाही. हे म्हणणे खरे नाही की पोलीसांनी माझे बयान नोंदवून घेतले नाही. हे म्हणणे खरे नाही की नंदा कांगणे ही माझी सहकारी असल्यामुळे तिच्या सांगण्यावरुन मी आज खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की मी सांगीतल्याप्रमाणे कोणतीही घटना घडली नाही व मी सभेला हजर नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की मी आज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला.**

**फेरतपास-काही नाही.** **श्रवणोत्तर स्वीकृत**

(पी.एस.इंगळे)

दिनांक - ११/१२/२०२५ अतिरिक्त सत्र न्यायाधीश, यवतमाळ.